# प्रकरण चौथे
# 'सिंहासन' कादंबरीमधील पत्रकारितेचे चित्रण

## ■ प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात अरुण साधू यांच्या 'सिंहासन' या कादंबरी मधील राजकीय सत्तास्पर्धा, राजकीय व सामाजिक घडामोडी, वृत्तपत्र, त्यातील पत्रकार व्यक्तिरेखा, त्यांची वैशिष्ट्ये तसेच या कादंबरीचे विशेष इ. बाबींचे तपशील वार विवेचन करणे अभिप्रेत आहे.

## १. 'सिंहासन': राजकीय कादंबरी

अरुण साधू यांची 'सिंहासन' ही कचुंबरी १९७७ मध्ये प्रकाशीत झाली. या कादंबरीला पत्रकारितेचे अंग असून ती राजकीय घडामोडीमुळे खूप गाजली आहे. ही कादंबरी लोकप्रिय झाली आहे. या कादंबरीला राजकीय कादंबरी म्हटले जाते कारण या कादंबरीला राजकारणाची पार्श्वभूमी आहे. अरुण साधू यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून राजकीय घडामोडीचे, त्यातील संघर्षाचे, राजकारणातील डावपेच, सत्तास्पर्धांचे चित्रण या कादंबरीतून केले आहे.

अरुण साधूंच्या 'सिंहासन' या कादंबरीत कोणतेही पात्र केंद्रस्थानी नाही तसेच या कादंबरीला नायक-नायिका नाहीत. अरुण साधू हे व्यवसायाने पत्रकार असल्यामुळे त्यांना महाराष्ट्राचा विधिमंडळाच्या प्रत्यक्ष कामकाजाची, मंत्रालयाची सर्व माहिती आहे. त्यामुळे 'सिंहासन'सारखी वेगळी कादंबरी लिहून राजकीय क्षेत्राचे प्रत्ययकारी चित्रण केले. अरुण साधूंनी महाराष्ट्राच्या सत्ताकारणाची, सत्तास्पर्धेची, विधिमंडळातील घटनांची,

नव्या खेळी, मुख्यमंत्रीपदासाठीची मोर्चेबांधणी, फुटीचं राजकारण इ. बाबीची योग्यरीत्या या कादंबरीत मांडणी केली आहे.

## १.१ 'सिंहासन'मधील आशयसूत्रे : राजकारणाचे सर्वांगीण दर्शन

'सिंहासन' या कादंबरीत अरुण साधू महाराष्ट्राचे राजकीय क्षेत्राचे चित्रण अत्यंत प्रत्ययकारी रीतीने करतात. त्याचा थोडक्यात पुढीलप्रमाणे विचार करता येईल. मुख्यमंत्री पदाच्या महत्त्वाकांक्षेने विद्यमान अर्थमंत्री विश्वासराव दाभाडे झपाटलेले आहेत. त्यामुळे ते आपल्या अर्थमंत्री पदाचा राजीनामा देण्याचे जाहीर करतात. अर्थमंत्री विश्वासराव दाभाडे हे महाराष्ट्राच्या सर्व आमदारांना आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न चालू करतात. त्यामुळे विद्यमान मुख्यमंत्र्यांचा एक गट आणि विश्वासराव दाभाडे यांचा एक गट असे दोन गट उभे राहतात. पुढील महिन्यात विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन आले आहे. त्या अधिवेशनात जनतेचे निरनिराळे प्रश्न आहेत. सरकारच्या काही नवीन समस्या आहेत परंतु हे सर्व प्रश्न, अधिवेशन बाजूला पडते त्याचवेळी विश्वासराव दाभाडे हे आपल्या राजीनाम्याचे संकट उभे करतात. ते आपल्याकडे सर्व आमदारांना वळविण्याचा प्रयत्न करून शक्तिप्रदर्शन करण्यामध्ये मश्गूल होतात. यामध्ये आमदारांना फोडणे, आपल्या बाजुने वळविणे, त्यांना वेठीस धरणे असे प्रकार सुरू होतात. प्रत्येकाच्या आयुष्यातील काही दुसऱ्या, कच्चा जागा पाहून त्यावर नख ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. सत्तास्पर्धा व स्वअस्तित्वामुळे प्रत्येक आमदार सावध झाले आहेत. लोकशाही प्रधान कोणत्याही राज्यात घडणाऱ्या सत्ताबदलाच्या चक्राचे अरुण साधूंनी नेमकेपणाने व तटस्थपणे चित्रण केले आहे.

अर्थमंत्री विश्वासराव दाभाडे आपल्या पदाचा राजीनामा देणार असल्याचे सांगितले ही बातमी फार मोठी व राज्याला हादरा देणारी होती. अर्थमंत्री विश्वासराव

दाभाडे हे आपली ताकद पुन्हा अजमावून पाहण्याचा प्रयत्न करीत आहेत. या घटनेमुळे राजकीय क्षेत्रात खळबळ सुरू होते. या खळबळीचे वर्णन अरुण साधू पुढील शब्दात व्यक्त करतात. ''टेलिफोन्स बिझी राहू लागले होते; नागपूर, मुंबई, औरंगाबाद, रत्नागिरी, नाशिक, अमरावती, पुणे आणि अशा कितीतरी गावामध्ये आणि परस्परात ट्रंक कॉल्सची वर्दळ सुरू झाली होती. खासदार, मंत्रीपदाचे इच्छूक आमदार, दबाव गटाचे नेते खुद्द मंत्री, त्यांची घरं, त्यांचे सल्लागार आणि हिंतचिंतक यांच्यात गडबड उडून गेली होती. विरोधी नेत्यांमध्येही कुणकुण सुरू झाली होती. बातम्यांची वर्तुळावर वर्तुळे निर्माण होऊ लागली होती. पण ती या एका मर्यादित विश्वात सत्तेशी ज्यांचा प्रत्यक्ष संबंध आहे किंवा दूरान्वयानेही जे सत्तास्थानाशी नाते सांगू इच्छितात किंवा सत्तापदांची वेडी स्वप्ने बघत असतात. अशा लोकांच्या, सामान्य जीवनाच्या विशुद्ध प्रवाहापासून दूर फुटलेल्या या वेगळ्या जगात.'

विधानसभेतील महत्त्वाकांक्षी आणि ताकदवान आमदारही आता रणात उतरतील. मंत्री मंडळावर निदान राज्यमंत्री म्हणून किंवा फार तर विधानमंडळ पक्षाच्या एखाद्या पदावर तरी जागा मिळावी, म्हणून त्यांचे प्रयत्न चालू होतील. कुठल्या तरी कमिटीवर वर्णी लावून घेण्याचा प्रयत्न करतील. काहींना लायसेन्सेस हवी आहेत. काहींना स्वत:साठी, काहींना दुसऱ्यासाठी, कुणाच्या मोटारींच्या प्रायॉरिटी मध्ये अद्याप नंबर लागलेली नाही. तो लावून घ्यावचा आहे. कुणाला मुंबईत फ्लॅट मिळवायचा आहे, मिळवून द्यायचा आहे. कुणाला जायकवाडीच्या क्षेत्राखालची जागा विकत घ्यायची आहे. कुणाला पेंचचं पाणी आपल्या मतदार संघातून न्यायचं आहे, कुणाला साखर कारन्याच्या पुढच्या निवडणूकीसाठी उभ राहायंच आहे, तर कुणाला जिल्हा परिषदेंच अध्यक्षपद हवं आहे, कुणाला दारू दुकानाचा परवाना हवा आहे, तर कुणाला स्पिरिटची डिस्ट्रिब्यूशन एजन्सी. अशा इतर अनेक गोष्टी नेहमीच या चालू असतात. पण आता त्यांना जोर येईल

अनेक कारण अशा राजकीय धुमाळीच्या काळात प्रसादाचं वाटप मुक्त हस्तानं होत असतं अशा काळात तोंडी झालेली देवाण घेवाण प्रमाणिकपणे पाळली जाते. असा सगळ्यांचा विश्वास असातो. तेंव्हा ही सुर्वणसंधी आता कुणी सोडणार नाही. सर्व आमदार, खासदार, पक्षकार्यकर्ते, पदाधिकारी, मंत्री या लढतीत मोठ्या हौसंन भाग घेतील''. [१]

मुख्यमंत्री व अर्थमंत्री विश्वासराव दाभाडे यांच्यात सत्तेसाठी संघर्ष आहे. हे दोघेही एकमेकांवर मात करण्याचे प्रयत्न करतात. विश्वासराव आपली ताकद अजमावून पाहताहेत. अन्य आमदार व मंत्र्यांच्या महत्त्वाकांक्षाही जाग्या झाल्या आहेत. इतर काही आमदारांनाही मंत्री व्हायचे आहे. कुणाच्या पारड्यात वजन टाकले तर आपले काम साधेल याचे आडाखे ते बांधत आहेत. अनेक आमदार हे असमाधानी, असंतुष्ट आहेत. विदर्भ, मराठवाडा, कोकण, मुंबई, पश्चिम महाराष्ट्र अशा आमदार, मंत्र्यांच्या फळ्या आहेत. यातील प्रत्येक सत्तेसाठी, खुर्चीसाठी घाईला आलेला आहे. डावे गट, उजवे गट, मुख्यमंत्री आणि अर्थमंत्री यांचे गट यांच्यात सचिवालयात, जिल्हा परिषदात, आमदार निवासात, सहकारी बँकात, साखर कारखान्यात आणि वर्तमानपत्राच्या कचेऱ्यांत जोरदार चर्चा सुरू आहे. सगळीकडे मुख्यमंत्री यांची खुर्ची या एकाच प्रश्नाची चर्चा आहे. राज्याचे प्रमुख नेतेपद आपल्याला कसं मिळेल. बाकीचे इतर प्रश्न गौण आहेत. परंतु नेते पद हे एकच असल्यामुळे मुख्यमंत्री व अर्थमंत्री यांच्यातील ही राजकीय स्पर्धा आहे. यावर अरुण साधू लिहितात की, ''सत्तरीतल्या दुष्काळासारखा दुष्काळ पुन्हा तोंड वासून समोर येतो आहे, की काय. अशी भीती वाटते आहे. कारण जुलै महिना उलटून चालला असला तरी अजुन देशावर पाऊस आलेला नाही. पेरण्या खोळंबल्या आहेत. राज्यात धान्यासाठी दंगली होताहेत. बेसुमार किंमती वाढताहेत. झोपटपट्ट्यांच्या कॅन्सर सर्व शहरात फोफावतो आहेच आणि दुष्काळाची झळ लागायला सुरूवात झाल्याने भूमीहीनांचे

आणि छोट्या शेतकऱ्यांचे तांडे अन्नासाठी शहरांकडे निघाले आहेत. पण हे प्रश्न गौण आहेत. आजचा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे नेतेपदाचा समस्त राजकीय वर्तुळाला याच प्रश्नांन झपाटलं आहे. " [२] या सर्व घडामोडीतून राजकारण, समाज व नेते यांची नैतिक पातळी किती प्रमाणात खाली गेली आहे हे दिसून येते.

राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांचा उल्लेख कादंबरीत सी. एम. म्हणूनच येतो. ते पुणे जिल्हातील आहेत. ते बुद्धिमान असुन इतरांशी अंतर ठेवून वागणारे चाणाक्ष गृहस्थ आहेत. त्यांची शेतीशी, शेती व्यवसायाशी बांधिलकी नाही. ते उद्योगधंद्यावर जास्त लक्ष केंद्रीत करणारे आहेत. मुख्यमंत्र्यांच्या राजकारणाबद्दल साधू लिहितात की, "सी. एम्. चं एवढं तुसडेपण असूनही तो खुर्चीत एवढा काळ कसा काय राहू शकतो. याच त्यांना आश्चर्य वाटत नाही. कारण एकच सत्ता! साडेपाच कोटी लोकांवर अधिराज्य गाजवण्याची, शिपायाचा मंत्री बनविण्याची आणि मंत्र्याचा शेतकरी करण्याची, अधिकाऱ्यांना चढवण्याची-पाडण्याची, कोट्यावधी रूपये इकडचे तिकडे करण्याची, सर्वदूर, बहुव्यापी सत्ता आणि सी. एम्. च्या हाती 'होम' असल्यामुळं तर या सत्तेला अधिकच धार चढते. ती अधिक प्रभावी होते. तिची व्याप्ती वाढते. सी. एम. च्या बोटाच्या एका इशाऱ्यासरशी माणसं नाचतात. नजरेच्या इशाऱ्यावर पावलं टाकतात. मंत्री, बडेबडे व्यापारी आणि कारखानदार माना झुकवतात."[३] या वक्तव्यातून मुख्यमंत्री साहेबांचा हेतू समजतो. जनतेला वेठीस धरून सत्ता मिळवणे, भ्रष्टाचार, गुंडगिरी यामार्फत जनतेची पिळवणूक करणेचा मानसही दिसतो आणि आपण सत्तेवर आल्यानंतर सर्वकाही करू शकतो असा स्वार्थ बाळगतो. ते विश्वासाने बोलताना दिसतात.

अर्थमंत्री विश्वासराव दाभाडे हे विदर्भातील आहेत. धनाढ्य, वतनदार वडिलांचे ते एकुलते एक चिरंजीवे आहेत. त्यानी शाळाकॉलेज मध्येही अनिर्बंध सत्ता

गाजविली आहे. त्याच्याकडे अमाप पैशातून येणारी सत्ता होती. अर्थमंत्री विश्वासराव दाभाडे यांच्याबद्दल अरुण साधू लिहितात की, "संपत्तीमधून स्त्रवणाऱ्या सत्तेच्या मर्यादा त्यांना कळू लागल्या, तेव्हा ते स्थानिक राजकारणात शिरले. कोणी आपल्या सत्तेवर मर्यादा घालणे त्यांना सहन होत नाही. म्हणून या मर्यादांवर मात करीत, ग्रामपंचायत, लोकल बोर्ड असा प्रवास करीत ते विधानसभेत आणि आता राज्यातल्या नंबर दोनच्या जागेपर्यंत येऊन पोहोचले होते. म्हणून, त्यांना एक नंबरच्या जागेवर आपला हक्कच आहे, असं प्रामाणिकपणे वाटत होतं." [४] अर्थमंत्री दाभाडे आपल्या राजीनाम्याचे नाटक पुढे करून विद्यमान मुख्यमंत्र्यासमोर आव्हान उभे करतात. त्यांच्या राजीनाम्यांच्या बातमीनेच या कादंबरीतील राजकीय नाट्यांची सुरूवात होते. अर्थमंत्र्याचा वसंतराव नावाचा उच्चशिक्षित मुलगा असून त्याची पंजाबी पत्नी कमला ही देखणी आहे. ती विश्वासरावांच्या राजकारणात पुढाकार घेते. विश्वासराव दाभाडे हे बेरजेचे राजकारण करणारे नेते आहेत. कोकणातले लक्ष्मण लांजेकर यांचा गट, नगरचे शुगरकिंग गणपतराव भोसले यांची ताकद, मराठवाड्यातील माणिकराव पाटील यांचा गट, रावसाहेब टोपले यांची ताकद अशी सगळीकडे बेरीज करण्याची त्यांची धडपड चालू असते. राज्याचे मुख्यमंत्री ही आपली स्वत:ची बाजू मजबूत करण्याचा मार्गाला लागलेले आहेत. माणसे जोडणे, विशेषत: त्या माणसाचे कच्चे दुवे, त्यांची नाजुक जागा हेरून त्यांना आपल्याकडे खेचणे, चालू स्थितीत निर्माण होणाऱ्या प्रश्नांना स्वत:च्या फायद्यासाठी वापरणे ही त्यांची रीत आहे. संधी उपलब्ध झाल्यामुळे प्रत्येकाच्या सत्तेच्या आकांक्षा जाग्या होतात व त्या दिशेने त्यांची वाटचाल सुरू होते. विधिमंडळाचे अधिवेशन जवळ आलेले असते व त्याच सुमाराला हे सारे राजकीय नाट्य सुरू होते. काहीतरी गडबड होणार, काहीतरी घडणार अशी चाहूल लागते.

विधिमंडळातील सरकारी अधिकारी, मंत्र्याचे स्वीय सचिव हा ही एक गट या राजकीय घडामोडीत महत्त्वाचा आहे. उदा. रांगणेकर हे मुख्यमंत्री यांचे पी. ए. आहेत. ते त्यांची सर्व कामे जबाबदारीने पार पाडतात. राज्याचे चीफ सेक्रेटरी नेने कायद्याच्या चौकटीत राहून चलाखीने मुख्यमंत्र्यांना मदत करतात. कारण मुख्यमंत्री हे मुख्यमंत्री आहेत तोपर्यंत आपले महत्त्व आहे हे त्यांना ठाऊक आहे.

जीवनराव वाघमारे हे अर्थमंत्री दाभाडे यांच्या गटातील आहेत. परंतु अर्थमंत्री दाभाडे यांनी आपल्यासाठी काहीही केलेले नाही हे त्यांना जाणवते. आपले मित्र आनंदराव टोपलेच्य साहयाने आपला पाठींबा मुख्यमंत्री याच्यांकडे आहे हे स्पष्ट करतात. बुधाजी गोडघाटे हा विदर्भातील दलित मंत्री आहे. त्याच्या आयुष्यात पूर्वी एक प्रकरण घडून गेलेले आहे. त्याला नानासाहेब गुप्ते यांनी राजकारणात आणलेले असते. कोकणातले आमदार लक्ष्मणराव लांजेकर यांना मंत्री होण्याची इच्छा आहे. विश्वासराव दाभाडे यांचे असाधारण बळ लक्षात घेऊन त्यांच्याजवळ ते आपली भावना व्यक्त करतात. नगरचे शुगरकिंग गणपतराव भोसले हे दाभाड्यांचे जवळचे असून त्याना साखर कारखानदारी, ऊस बागाईत यांच्या संबधातील काही कलमे पास करून घ्यायची असतात.

अर्थमंत्री विश्वासराव दाभाडे यांच्या राजीनाम्याच्या बातमीमुळे निर्माण झालेल्या अवस्थेमुळे मुख्यमंत्री विधिमंडळाचे अधिवेशन एक आठवड्याने पुढे ढकलल्याची घोषणा करतात व त्याच वेळी सध्याच्या कामाची व्याप्ती पाहता मंत्रीमंडळाचा विस्तार करणे आवश्यक झाले आहे, असे निवेदन देतात. नंतर मुख्यमंत्री राज्याच्या कामकाजासाठी दिल्लीला निघून जातात. मुख्यमंत्र्यांच्या घोषणेमुळे सर्वत्र उत्साहाचे वातावरण पसरले होते. याविषयी अरुण साधू लिहितात की, ''मंत्रीमंडळात बदल म्हटला की, त्याचा पहिला दृश्य परिणाम मंत्र्यांच्या स्टाफवर होतो आणि आताचा

होणारा बदल काही साधा बदल असणार नव्हता. मुख्यमंत्री  आणि विश्वासराव दाभाडे यांच्या या लढतीत कोण जिंकतं यांच्यावर अनेक मंत्र्यांचं भवितव्य ठरणार होतं. अनेक डोकी गडगडणार होती आणि अनेक नवीन येणार होती. आणि मंत्री गेला की त्यानं निवडलेला स्वत:चा वैयक्तिक स्टाफ ही आपापल्या जुन्या डिपार्टमेंटमध्ये जातो. त्याचं सगळं महत्त्व संपतं. आतापर्यंत मंत्र्याचा पी. ए. म्हणून रूबाबात वावरणाऱ्याला पुन्हा साधा क्लार्क म्हणून एखाद्या सामान्य सुपरवायझरला सलाम करावा लागतो.''[५] या पार्श्वभूमीनुसार राज्यातील प्रत्येक आमदार, मंत्री आपापल्या ताकदीनुसार प्रत्येकजण डाव टाकत राहतो. राज्याचे मुख्यमंत्री व अर्थमंत्री आपली ताकद वाढविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. याबाबतीत विश्वासराव दाभाडे व कमला पुढील राजकीय चर्चा करतात.

``लांजेकरांचा आजार, उस्मान दळवीचा प्रभाव, त्याची माणसं जमवण्याची हातोटी आणि उपयुक्तता, दत्ताजी जाधवांचे वीक पॉईंटस्, कृषीमंत्री माणिकराव पाटीलांचा बावळटपणा, अर्जुन मोरेची तारेवरची कसरत, मारोतराव पवार आणि भगवानराव कुणगेकर यांच्यातील स्पर्धेचा आपल्याला होऊ शकणारा उपयोग, बुधाजी गोडघाटेची समस्या आणि रावसाहेब टोपले प्रकरणाची प्रगती... प्रत्यक्ष पार्टी-मिटिंग झाल्यास कोणाचा मागे किती माणसं उभी राहू शकतील याचा अंदाज आपण दोन दिवसात देऊ शकू, असा कमलेला भरवसा होता.''[६]

राज्याचे मुख्यमंत्रीही  हालचाली करतात. त्यानुसार नानासाहेब गुप्त्यांना बुधाजी गोडघाटेवरचा प्रश्न यादीत घ्यायला लावतात. रावसाहेब टोपले यांच्या मुलाच्या केससंबंधी त्यांना खिंडीत पकडून त्यांना आपल्याकडे वळवितात. अर्थमंत्र्यापेक्षा मुख्यमंत्र्यांकडे मोठी ताकद आहे. त्या ताकदीद्वारे ते इतरांना प्रलोभने दाखवू शकतात, पेचात पाडून आपल्याकडे वळवू शकतात. त्याप्रमाणे रावसाहेब टोपले यांची ताकद माणिकरावांना आपल्याकडे वळविण्यासाठी वापरतात. विश्वासराव दाभाडे हे माणिकराव

पाटील व दत्ताजीराव जाधव यांची बैठक बोलावतात आणि नेमकी बैठक सुरू असतानाच मुख्यमंत्री यांना दिल्लीत अॅटक आल्याची बातमी येते. त्यामुळे त्याच्या बैठकीत काहीच निर्णय न होता ती विसकटली जाते. आमदार श्रीपतराव शिंदे हे दोन्ही गटाच्या खेचाखेचीने अस्वस्थ होऊन रेल्वेच्या रूळाखाली सापडून ते मृत्यूमुखी पडतात.

अर्थमंत्री व मुख्यमंत्री यांच्यातील संघर्ष हा एक निर्णायक क्षणी थांबतो त्यावेळी तिथे विश्वासराव दाभाडे यांचा अर्थमंत्री पदाचा राजीनामा मुख्यमंत्री स्वीकारतात. मंत्रीमंडळातील दुसऱ्या क्रमांकाचे पद माणिकराव पाटील यांना दिले जाते. मंत्रीमंडळाच्या पुनर्रचनेत राज्यमंत्री असलेले आनंदराव टोपले यांना अर्थ खात्याचे मंत्री म्हणून नियुक्त केले जाते. बुधाजी गोडघाटे यांच्याकडे गृहखाते दिले जाते. जीवनराव वाघमारे व मुरूडचे उस्मान दळवी यांना राज्यमंत्री पद दिले जाते. याच दरम्यान राज्यात पाऊसही सुरू होतो. त्यामुळे खेड्यापाड्यातील शेतकऱ्यांच्यात उत्साहाचे वातावरण निर्माण होऊन ते उत्साहाने शेतावर काम करण्यास जात आहेत. ‘‘उद्या याच वेळी आणखी बातम्या येतील, परवा येतील, रोज शब्दांचे पाऊस पडतील. पण त्यांनी कोट्यावधी लोकांचा जीवनक्रम मुळीच बदलणार नव्हता. जणू कुठंच काहीही घडलेलं नाही’’[७] हा ‘सिंहासन’ या कादंबरीचा शेवट असून तो शेवट राजकीय परिस्थिती वरील भाष्य करणारा आहे असे वाटते.

रवींद्र शोभणे ‘सिंहासन’ कादंबरीबद्दल म्हणतात की, ‘‘सत्ताचक्राच्या या नाट्यात किंवा रान उठविण्यात अर्थमंत्री विश्वासराव दाभाडेंनी खेळलेली खेळी पुरेशी विचारपूर्वक नव्हती किंवा त्यात राजकीय मुत्सद्दीपणा नव्हता. असे दिसते. सत्ताबदलाचा या खेळात स्पर्धकाने उघडउघड अशी भूमिका घेणे आणि तेही आपल्या पाठीशी पुरेसे आमदारांचे पाठबळ नसताना ही, ही गोष्ट एकीकडे मुत्सद्दी म्हणून उभे राहणाऱ्या विश्वासरावांच्या दृष्टीने कच्ची वाटते. त्यासाठी विश्वासरावांनी केलेले राजीनामानाट्य हे एवढ्या तडकाफडकी वृत्तपत्राच्या पानांवर येणे हेही त्यांच्या मुत्सद्दी पणाचे लक्षण दिसत

नाही. शिवाय सर्वोच्च सत्तेसाठी पक्षांतर्गत बंडाळीपेक्षा पक्षप्रमुख-हायकमांडचा विश्वास आणि कृपाप्रसाद हा अधिक महत्त्वाचा आणि निर्णायक असा ठरतो. हे नेहमीच्याच मुख्यमंत्री बदलाच्या वेळी सहजपणे दृग्गोचर होणारी घटना असते.''[८] हे रवींद्र शोभणे यांचे अर्थमंत्री विश्वासराव दाभाडे यांच्या बद्दलचे मत पटते. ते योग्य आहे असे वाटते.

कुमार केतकर 'सिंहासन' कादंबरी विषयी आपले विचार पुढीलप्रमाणे मांडतात की, ''सिंहासन' ही फक्त कादंबरी नव्हे तर प्रचलित राजकारणावरचे ते भाष्य व निरूपणही आहे. महाराष्ट्रातील सिंहासनाचे पाय कापण्याचे, इकडेतिकडे खेचण्याचे, उलटेपालटे पाडण्याचे प्रयोग 'सिंहासन' कादंबरी प्रसिद्ध झाल्यानंतर प्रकर्षाने सुरू झाले. वर म्हटल्याप्रमाणे १९६३ ते १९७५ अशी ११-१२ वर्षे राज्याला एकच मुख्यमंत्री होता. तो ही विदर्भातला आणि बंजारा. परंतु १९७५ ते १९८७ या त्यानंतरच्या १२ वर्षाचा काळात मात्र आठ वेळा मुख्यमंत्री बदलायचा प्रसंग आला. शंकरराव चव्हाण (१९७५-७७), वसंतदादा पाटील (१९७७-७८), शरद पवार (१९७८-८०), अंतुले (१९८०-८१), बाबासाहेब भोसले (१९८२-८३), निलंगेकर (१९८३-८५), वसंतदादा पाटील (१९८५-८७), आणि नंतर पुन्हा शरद पवार हे सर्व बदल 'सिंहासन' कादंबरीतील संहितेप्रमाणे झाले. प्रसंगानुरूप बदल करून! म्हणजे आता वास्तवच कलेचे अनुकरण करू लागले होते. कलाकृतीला वास्तवाने दिलेली ही सर्वात मोठी पावती होती.''[९] हे त्यांचे विचार पटतात.

## २. 'सिंहासन' मधील राजकीय व सामाजिक घडामोडी, वृत्तपत्र यांच्या संदर्भातील पत्रकारितेचे चित्रण

अरुण साधू यांच्या पत्रकार व्यक्तिमत्त्वाचा परिणाम 'मुंबई दिनांक' प्रमाणे या कादंबरीवरही झाला आहे. या कादंबरीत वृत्तपत्रीय पातळीवरून व दूरदर्शन पत्रकारितेतून

सामाजिक जीवनातील घडामोडी, राजकीय व राजकारणातील घडामोडी, विविध राजकीय नेत्यांचे व्यक्तिचित्रण, राजकारणातील सत्ता संघर्ष, ग्रामीण भागातील घटना, वृत्तपत्र जगताचे चित्रण केले आहे.

'सिंहासन' या कादंबरीत 'दै. उषावार्ता' या मराठी दैनिकातील वार्ताहर दिगू टिपणीसच्या माध्यमातून चित्रण केले आहे. 'दै. उषावार्ता' या वृत्तपत्रासाठी मुंबई शहराची व राजकीय बातम्यांची जबाबदारी दिगूवर असते. 'दै उषावार्ता' च्या वृत्तपत्राचा 'सांयवार्ता' हा अंक ही आहे. या कादंबरीत वृत्तपत्रातील संपादक, उपसंपादक, सहसंपादक, स्तंभलेखक, पत्रकार, वार्ताहर अशा माणासांच्या वर्तनातील बारकावे टिपले आहेत. दिगू दररोज उषावार्ताच्या कार्यालयात फोन करून वृत्तपत्रीय बातम्यांचा खुलासा करीत असतो. दिगू टिपणीस हा सर्व राजकीय वर्तुळातील लोकांच्या ओळखीचा आहे. दिगू टिपणीस याला आमदार अर्जुन मोरे हे अर्थमंत्री दाभाडे आपल्या पदाचा राजीनामा देणार असल्याचे सांगतात. अर्थमंत्री विश्वासराव दाभाडे आपल्या पदाचा राजीनामा देणार ही बातमी फार मोठी व राज्याला हादरा देणारी होती. यावर दिगूचे विचारचक्र सुरू होते. दिगूने यावरून किंवा आणखी माहिती गोळा करून बातमी दिली असती परंतु नुसत्या बातम्या मिळवून त्या छापणे एवढाच दिगूचा हमाली उद्योग नव्हता. त्याला आपली पत्रकारिता मनापासून आवडत होती. पण कुठे काय चालू आहे याची आपल्याला सर्वप्रथम माहिती असावी अथवा ती कळावी अशी त्याच्याकडे पत्रकारी जिद्द होती. दिगू हा राजकीय वर्तुळात सर्वत्र वावरून माहिती काढणारा सर्वज्ञ असा पत्रकार आहे. अर्थमंत्री विश्वासराव दाभाडे हे आपली ताकद पुन्हा अजमावून पाहण्याचा प्रयत्न करीत आहेत. कदाचित एक दोन दिवसात ते आपला राजीनामा देतील असे मुख्यमंत्र्याना दिगू सांगतो. नंतर दिगू अर्थमंत्र्याशी फोन करून राजीनाम्याची खात्री करून घेतो. परंतु दिगूला ही बातमी छापू नकोस असे अर्थमंत्री सांगतात पण दिगू हा कोणालाही न घाबरता

अर्थमंत्र्याच्या राजीनाम्याची पार्श्वभूमी छापून सर्वत्र खळबळ उडवून देतो. अरुण साधू दिगूच्या पकिारितेबद्दल लिहितात की, "दिगू हा काही तसा झटकून टाकण्यासारखा पत्रकार नव्हता. आतापर्यंत त्यानं चार मुख्यमंत्री पाहिले होते. तिघा मंत्र्याना त्याच्या बातम्यांमुळे राजीनामे द्यावे लागले होते. राज्यातल्या सगळ्या बारीकसारीक राजकीय घटनांची, उलाढालींची, अनेकांच्या गुंतागुंतीच्या परस्पर राजकीय संबंधांची त्याला जवळून माहिति होती. मुंबईतल्या राजकीय वार्ताहरामध्ये त्याचा शब्द अखेरचा आहे. दिगूचा पेपर खरं म्हणजे तसा शुल्लक पण बरेच विशेष प्रतिनिधी त्याच्या ओंजळीतलं पाणी पिऊन आपली राजकीय वार्तापत्रे लिहितात. बरेच आमदार, इतकंच काय कितीतरी नवे मंत्री त्याचा सल्ला घेतात. असा दिगूचा भाव होता. आणि एवढ सगळं करूनही दिगू ताठ राहणारा होता. सगळ्यांमध्ये मिसळत होता, पण कोणापुढे वाकत मात्र नव्हता."[१०] हे दिगू विषयीचे व्यक्त झालेले विचार योग्य वाटतात. दिगूची पत्रकारिता ही शोधक आहे.

महाराष्ट्रात आणि या देशात कित्येक लोक दारिद्र्य यातनांनी मरतात किंवा हाय खाऊन प्राण टाकतात किंवा मार खाऊन जीव सोडतात. त्याने फारसे काही बिघडत नाही. परतु इंदापूर तालुक्यातील चिरंगुटे गावातील तीन संशयास्पद भूकबळी पडले होते याची माहिति विरोधी पक्षाचा एक कार्यकर्ता वृत्तपत्राला बातमी पाठवितो. त्या बातमीने खळबळ उडालेली आहे. ती बातमी पुढीलप्रमाणे आहे,

"**चिरंगुट्यात भूकबळी**

इंदापूर दि. : येथून दहा मैलावर असलेल्या चिरंगुटे या गावी दुष्काळाची भयानक परिस्थिति असून दलित वस्तीत एकाच कुटुंबातील तीन भूकबळी पडल्याचे सांगण्यात येते.

मृतांची नावे अशी : रामा गाडेकर (५५), महादू रामा गाडेकर (३६) आणि दोन महिन्याचे एक अर्भक. हे अर्भक महादूची नात असल्याचे सांगण्यात येते. सदरील

कुटुंबास लागोपाठ चार दिवस अन्नावाचून काढावे लागल्याचे समजते. गावच्या एका कार्यकर्त्याने मात्र मृतांपैकी महादूचा मृत्यू उपासमारीने झाला नसून मारामारीनंतर झाला, असे सांगितले. गावच्या एका वजनदार व्यक्तीशी वैमनस्य आल्याने महादूला मार देण्यात आला आणि त्यातूनच त्याचा मृत्यू उदभवला, असे गावात सर्वत्र बोलले जाते. पण याबाबतीत पोलीस तक्रार झालेली नाही."[११] अशी ही बातमी छापून आली. उपसंपादकांनी त्या बातमींच गोड कौतुक केले नाही. एक दोन विरोधी आमदारांनी ही बातमी वाचून विधानसभेसाठी प्रश्न पाठवून दिले. विश्वासराव दाभाडे यांच्या नजरेतून ही बातमी सुटत नाही. त्यांना झटकन या बातमीच्या उलगडा होतो. तो पुढीलप्रमाणे,

"आनंदराव टोपले आणि चिरंगुट. रावसाहेब टोपल्याचे चिंरगुटे. रावसाहेबांच सी. एम. शी नातं. तीन भूकबळी आणि हो! मधला कोण? मारामारीत त्याचा खून. गावातील अतिशय वजनदार व्यक्तीशी वैमनस्य... सारे धागे जुळले आणि ती बातमी त्यांच्या डोक्याच्या एका महत्त्वाच्या कोपऱ्यात फिट बसली. काही उपयोग करण्यासाठी म्हणून नाही, पण अशी बातमी कधीच निरूपयोगी नसते! तिचा कधीतरी उपयोग होतोच. "[१२] अर्थमंत्री दाभाडे विधान करतात. पुढे दाभाडे आपली ताकद पून्हा अजमावून पाहण्यासाठी या बातमीचा उपयोग करण्याचा प्रयत्न करतात. अर्थमंत्री दाभाडे यांच्या सांगण्यावरून जास्तीतजास्त पेपरामध्ये ती बातमी आली आहे. तिसऱ्या दिवशी बातमी चांगले छायाचित्र देऊन पुन्हा प्रसिद्ध होते. त्या बातमीमध्ये सेक्स, दारिद्र्य, खून, उपासमार, भूकबळी, मारामारी, ग्रामीण दादागिरी, नवं राजकारण, विषमता इ. विषयांचा समावेश होता. खाली मान घालून मूकपणे अश्रू ढाळणाऱ्या शेवंतीचे ओक्साबोक्शी रडण्याऱ्या महादूच्या बायकोचे व तिची तीन मुले तिच्याकडे केविलवाण्या नजरेने बघत आहेत असे छायाचित्र त्या बातमीत आहे. मुंबईच्या मराठी व इंग्रजी वृत्तसृष्टीत रोखठोक व विदारक बातमी आहे. या बातमीची नोंद राजकीय इतिहासात होणे क्रमप्राप्त होते.

दिगू हा अर्थमंत्र्याच्या राजीनाम्याविषयी प्रांताध्यक्ष शिवाजीराव राणे यांच्याशी चर्चा करतो. त्यानुसार अखिल भारतीय अध्यक्षांनी दोघांमध्ये समेट घडवून आणण्याची कामगिरी शिवाजीराव राणे यांच्यावर सोपवली आहे. अशी बातमी तयार करून दिगू पेपरला देण्याची व्यवस्था करतो.

विधिमंडाळाचे पावसाळी अधिवेशन एक आठवड्याने पुढे ढकलल्याची व राज्याच्या मंत्रीमंडळात असलेल्या काही खात्याच्या मंत्र्यांना जादा काम पडत असल्याचे निदर्शनास आल्याने सध्याच्या मंत्रीमंडळात वाढ करणे या दोन बातम्या प्रसिद्ध होतात. काहीजण या बातम्या रेडिओवर ऐकतात, काहीजण वृत्तपत्रात वाचतात. या बातम्यामुळे राजकीय जीवनात जी खळबळ उडालेली आहे त्याचे चित्रण अरुण साधू पूढील शब्दात करतात, ''बातम्यामुळे धमाल उडाली होती, ती आमदार निवासात, मंत्र्याच्या निवासस्थानी आणि मुंबई बाहेर, राज्यात सर्वत्र विखुरलेल्या क्रियाशील राजकीय कार्यकर्त्यांत, मधमाश्यांच्या पोळ्यावर खडा मारावा, तशी स्थिती त्या बातमीमुळे आमदार निवासाची झाली. कित्येक आमदार आपापल्या खोल्यांच्या बाहेर येऊन एकमेकांच्या पाठी थोपटू लागले. कित्येक फोनशी भिडले आणि इतर कित्येक बाहेर येऊन समूहाने चर्चा करू लागले. आणखी इतर काही अधिक क्रियाशील सदस्य गाडी, टॅक्सी मिळेल ते वाहन पकडून आपापल्या इच्छित स्थळी मार्गस्थ होऊ लागले. अस काय त्या बातम्यांत होतं? समोर जबडा पसरून बसलेल्या दुष्काळाची जाणीव? छे... छे... दुष्काळ तर या देशाच्या पाचवीलाच पुजलेला आहे. दुष्काळ ही त्यांच्या दृष्टिनं बातमीच नव्हे. विधिमंडळाचं पुढ ढकलेले अधिवेशन? छे. त्यामुळेही एवढा हलकल्लोळ माजण्याची गरज नाही. परवा नाही तर पुढच्या आठवड्यात अधिवेशन भरणार आहे. भत्ते काही बुडत नाहीत. पक्षाची सभा ही पुढे ढकलल्यामुळे ही काही बिघडत नव्हते. नाही तरी पक्षामध्ये होतं काय? पुन्हा मंत्र्यांचीच भाषण ऐकावी लागतात. तेंव्हा असल्या बातम्यामुळे बहुसंख्य

धीरोदात्त आमदार विचलित होणाऱ्यापैकी नव्हते. विजेच्या झटक्याप्रमाणे त्यांना चटका लावून खडबडून जागं करणारी बातमी म्हणजे मंत्रीमंडळातील संभाव्य वाढ. रस्त्यात आडव्या बसलेल्या म्हशीला शिव्या घाला, रट्टे हाणा, की शेपूट पिरगळा, ती ढम्म हलत नाही. पण एखाद्या पोरांन हळूच तिच्या कानात सांगावं आणि तिंन शिंग झटकून, शेपूट झडझडत ताडकन उभं राहावं, तीच जादू या बातमीमुळं झाली होती. मंत्रिमंडळातील वाढ म्हणजे काही साधी गोष्ट नव्हे. मंत्री म्हणजे एका खात्याचा कर्ता करविता. मंत्रालयाचा एकदम सहावा मजला. चेंबर, फायली, पट्टेवाले, सेक्रेटरी, शिपाई, कार, बंगला, टूर्स, फोटो, भाषणे, प्रसिद्धी, प्रेस कॉन्फरन्सेस, वार्ताहरांचा घोळका, बोटाच्या इशाऱ्यांसरशी धावपळ करणारे अधिकारी, मंत्रीपद ही काही सामान्य गोष्ट नव्हे, बहुतेक आमदार नेहमीच मंत्रीपदाची स्वप्न पाहतात. मुख्यमंत्री स्वत:च मंत्रिमंडळात वाढ करण्याची घोषणा देतात, तेव्हा तर सगळ्याच आमदारांना ही स्वप्न प्रत्यक्षात आणण्याची संधी उत्पन्न होते. ही संधी घालवणं म्हणजे मुर्खपणाच, म्हणून ही गडबड.'[१३]

दिगू टिपणीस हा आपल्या 'दै. उषावार्ता' या वृत्तपत्रासाठी रूटीनच्या बातम्यापेक्षा वेगळ्या काही तरी बातम्या देत असतो. दै उषावार्ता हे वृत्तपत्र विशेषत: राजकीय घडामोडीवर प्रकाश टाकणारे वृत्तपत्र आहे.

महसूलमंत्री असणारे दत्ताजीराव जाधव यांना वृत्तपत्र व त्यातील पत्रकार यांचा आपल्याला फारसा उपयोग नाही असे ते मानतात. दिगू विषयी त्यांचा मनात राग आहे. ते बातमीदारांकडे दुर्लक्ष करणारे आहेत. दिगूशी ते फारसे बोलत नव्हते. दत्ताजीराव जाधव यांच्याकडे मिटिंग सुरू असताना दिगू टिपणीस हा मुख्यमंत्र्यांना दिल्ली येथे अॅटॅक आला असून त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल केले असल्याची बातमी दत्ताजीराव जाधव यांना देतो. आपल्याकडे मिटिंग चालू आहे हे दिगूला कस कळलं? याचे दत्ताजीराव जाधवांना आश्चर्य वाटते. मुख्यमंत्र्याच्या बातमीमूळे त्यांच्या मिटिंगचा संदर्भ बदलतो.

यावेळी दत्ताजीराव जाधवांना दिगूच्या बातमीदारी विषयी कौतुक वाटते. कारण या बातमीमुळेच त्यांच्या मिटिंगमधील चर्चेचा संदर्भ बदलणार होता या विषयी त्यांना खात्री होती. दत्ताजीराव जाधव हे दिगूला आपल्या या मिटिंगची बातमी छापू नकोस असे सागंतात. त्यांची ही मिटिंग कोणताही निर्णय न घेता संपते. दिगूची पत्रकारिता ही शोधक असून ती डोळस आहे. मुख्यमंत्र्यांना ॲटॅक आल्यानंतर दिगूची व त्याच्या दै. उषावार्ताच्या संपादकाची त्या बातमी विषयीची दुरध्वनीवर झालेली चर्चा पुढीलप्रमाणे आहेत :

"घंटा वाजली म्हणून दिगूनं फोन उचलला.

"हॅलो, कोण दिगू? आलास बाबा अखेर ऑफिसात! काय बातमी आहे?"

"घ्या, म्हणजे तुम्हाला माहीतच नाही, आणि तुम्ही स्वत:ला संपादक समजता."

"अरे, पण झालय काय? तू सांगितल्याशिवाय कसं कळेल?"

"सी.एम्.ना दिल्लीत हार्टचा ॲटॅक आला."

"काय, सांगतोस काय?"

"हो."

"सीरियस ?"

" नाही, सीरियस नाही. म्हातारा वाचला."

"अच्छा. कुणी देशपांडेन फोन केला, वाटतं?"

"हो."

"आहे का कॉपी जवळ! वाच बरं. आठ कॉलमी बॅनर द्यायला सांग. आणि फोटो घाला म्हणावं..."

"दिगूनं बातमी वाचून दाखवली. संपादक म्हणाले,"

"काय वय असेल रे, म्हाताऱ्याचं?"

"आता दोन महिन्यांत साठी येते आहे. तयारीत राहा, तुम्हाला आरत्या ओवाळाव्या लागतीलच."

"हा: हा:, बघू. आत्ताचं प्रकरण फारसं सीरियस नाही नं."

"छे...छे.. बिलकूल नाही. पंधरा दिवसांत म्हातारा ठणठणीत होऊन मंत्रालयात येतो, की नाही, बघा. म्हणजे असं रिपोर्टवरून वाटतं बरं खरं ते डिटेल्स् आणखी आल्यावरच कळेल."

" हां . तेही ठीक आहे. आता याचा तुमच्या दोस्त मंडळीवर काय परिणाम होणार?"

"कसला परिणाम व्हायचा? आतापर्यंत आतून खेळी खेळत होते. आता उघड उघड मैदानात येतील."

"आणि ते कॅबिनेट एक्स्पान्शनचं काय?"

"तेही बघायचं"

"दे बरं टेबलावर फोन कुणाला तरी."[१६]

दिगू टिपणीस हा आपल्या वृत्तपत्राच्या संपादकाच्या सल्ल्यानुसार बातम्या देत असतो. या बातमी वरून दिगूच्या ठिकाणी दुरदृष्टी हा गूण दिसून येतो.

आमदार श्रीपतराव शिंदे दोन्ही गटांच्या खेचाखेचीने अस्वस्थ होऊन रेल्वेरूळाखाली सापडतात. त्यामध्ये त्यांचा मृत्यू होतो. त्यांच्या मृत्यूच्या बातमीविषयी अरूण साधू लिहितात की, "दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रांची पहिली पानं श्रीपतरावांच्या मृत्यूच्या आणि अंत्ययात्रेच्या वार्तेनंच भरली होती. श्रीपतराव शिंदे कोण, हे देखील अनेक वृत्तपत्र - वार्ताहरांना आणि संपादकांना माहीत नव्हत. पण महाराष्ट्रातल्या बहुतेक वृत्तपत्रांनी छायाचित्रांसह लांब लांब बातम्या छापल्या होत्या; अग्रलेख लिहिले होते. बहुतेक वृत्तपत्रांमध्ये आणखी एक छायाचित्र आलं होतं. मुंबई सेंट्रलच्या प्लॅटफॉर्मवर वार्ताहरांनी जेव्हा सी.एम्.ना ही बातमी सांगितली. तेव्हा सी.एम्.ना अश्रू आवरले नाहीत.

त्यांनी डोळयांना रूमाल लावला आणि आजारी सी.एम्. चे छायाचित्र काढण्याच्या इरादयांन आलेल्या अनेक फोटोग्राफर्सनी फटाफट फ्लॅशेस मारले.

''आमची सदसद्विवेक बुध्दी सतत जागृत ठेवणारा आणि गरिबांवरील निष्ठा सतत तेवत ठेवणारा क्रांतीचा शिपाई गेला... '' [१७] अशी एका वाक्याची सी.एम्. ची प्रतिक्रिया सर्वत्र ठळकपणे छापून आली. येथे सत्शील राजकिय नेत्याला त्याच्या मृत्यूनंतर श्रद्धांजली पुरते, उल्लेखिले जाते याचा प्रत्यय येतो.

दिगू वार्ताहर असल्यामुळे राजकीय जीवनाच्या वर्तुळात राहून, संपर्कात राहून, माहिती घेऊन आपल्या पेपरला बातम्या देत असतो. दिगूला राजकारणातील घडामोडीचे कुतूहल आहे. आमदार मोरेकडून विश्वासराव दाभाडे यांच्या राजीनाम्यासंबंधी बातमी मिळताच तो मुख्यमंत्र्याशी संपर्क करतो. नंतर अर्थमंत्री विश्वासराव दाभाड्यांशी संपर्क करतो, नंतर पक्षाध्यक्ष राणे यांच्याशी पुढे दत्ताजीराव जाधव, श्रीपतराव शिंदे यांच्याशी दिगू या सत्तासंघर्षाची चौकशी करत वृत्तपत्रात बातम्या छापून त्या सत्तासंघर्षाला गती देत असतो. या सत्तासंघर्षाचे सुरू झालेले चक्र विश्वासराव दाभाडे यांचा राजीनामा स्वीकारल्यानंतर थांबते. या संदर्भातील प्रादेशिक बातमी पुढील प्रमाणे आहे.

राज्याच्या मंत्रिमंडळाची पुनर्रचना व वाढ केल्याची महत्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्र्यांनी आज सायंकाळी वार्तापरिषदेत केली अर्थमंत्री विश्वासराव दाभाडे यांचा राजीनामा खेदपूर्वक स्वीकारल्याचंही त्यांनी यावेळी जाहीर केलं. मंत्रिमंडळातील व्दितीय क्रमांकाच स्थान आता कृषिमंत्री श्री. माणिकराव पाटील यांना प्राप्त होईल, असंही त्यानी सांगितलं.

मंत्रिमंडळाच्या पुनर्रचनेत एक राज्यमंत्री व एक उपमंत्री यांना बढती मिळाली असून दोन नव्या राज्यमंत्र्याचा समावेश करण्यात आला आहे. राज्यमंत्री श्री. आनंदराव

टोपले अर्थखात्याचे मंत्री म्हणून नियुक्त झाले असून उपमंत्री श्री. बुधाजीराव गोडघाटे यांना गृहखाते देण्यात आले आहे.

दोन राज्यमंत्री नव्यानं नियुक्त केले आहेत. ते म्हणजे अमरावतीचे जीवनराव वाघमारे आणि मुरूडचे उस्मान मोहंमद दळवी. त्यांच्या खात्यांविषयीचा निर्णय लवकरच होईल, असं मुख्यमंत्र्यानी वार्ताहरानां सांगितले.[१८]

अर्थमंत्री विश्वासराव दाभाडे यांचा राजीनामा स्वीकारताना मुख्यमंत्र्याना दु:ख झाले. कारण त्यांच्या विस्तृत अनुभवाची आणि नेतृत्वाची गरज शासनाला होती. अर्थमंत्री विश्वासराव दाभाडे यांना मंत्रिमंडळात राहण्याची उत्सुकता नसल्यामुळे मुख्यमंत्री यांचा राजीनामा स्वीकारतात. शेवटी या राजकीय सत्तासंघर्षात अर्थमंत्री विश्वासराव दाभाडे यांना हार पत्करावी लागते.

'सिंहासन' या कादंबरी मधील सर्व घटना मुंबईच्या भूमीत घडतात. या सर्व घटनांवर दै. उषावार्ता या मराठी दैनिकाचा वार्ताहर दिगू टिपणीस सजगपणे लक्ष ठेवणारा आहे. दै. उषावार्ता या सारख्या सामान्य वृत्तपत्रातील दिगूची मुख्यमंत्री, अर्थमंत्री व इतर मंत्री किंवा मंत्रालयातील अधिकारी वर्ग यांच्यामध्ये वट व दबदबा आहे. चौथा स्तंभ म्हणून ज्या वृत्तपत्र माध्यमाची भूमिका लोकशाहीत आणि सत्तेमध्ये बदल घडवून आणण्यात अधिक महत्त्वाची असते. तो चौथा स्तंभ दै. उषावार्ता या वृत्तपत्रातून दिसून येतो. सत्ताबदलाच्या प्रक्रियेत वृत्तपत्र माध्यमाची भूमिका महत्त्वाची ठरते. लोकमताच्या पार्श्वभूमीसाठी सत्ताधार्जिणी वृत्तपत्राची भूमीका महत्वाची असते. त्याप्रमाणेच सत्ताविरोधी वृत्तपत्राची भूमिका महत्त्वाची ठरते परंतु या कादंबरीमध्ये सत्ताविरोधी भूमिका घेणारी वृत्तपत्रे दिसत नाहीत.

## ३. 'सिंहासन' मधील पत्रकार व्यक्तिरेखा

अरुण साधू यांच्या 'सिंहासन' या कादंबरीत दिगू टिपणीस ही एकमेव पत्रकार व्यक्तिरेखा आहे.

### दिगू टिपणीस

दिगू टिपणीस हा दै. उषावार्ता या मराठी दैनिकाचा राजकीय वार्ताहर आहे. मुंबई शहराच्या व राजकीय घडामोडीच्या बातम्याची जबाबदारी त्याच्यावर आहे. तो मुख्य वार्ताहर आहे.

दिगू टिपणीस हा मुळचा कोकणातील आहे. त्याच्या घरी अठरा विश्व दारिद्र्य होते. त्याला वडिलांची पुसटशी आठवण असते. वडील वारल्यानंतर त्याने व आईने भरपूर कष्ट केले आहेत. दिगूला प्रगती करण्याची संधी मिळत असताना पूढे त्याने स्वातंत्र्य -संग्रामात उडी घेतली. दिगू हा शाळेत हुशार होता. तो नादारी, स्कॉलरशीप मिळवीत शिक्षण घेत होता. परिस्थितीमुळे त्याने अर्धवट शिक्षण सोडले होते. त्याने स्वातंत्र्य-संग्रामातभाग घेतला असून त्याने स्वातंत्र्य सैनिकांचे ताम्रपत्र मिळविण्याचाही प्रयत्न केला नाही. त्यानंतर त्याने मुंबईत येऊन पत्रकारिता स्वीकारली होती.

दिगू टिपणीस हा अविवाहित असून मुंबईतील एका चाळीत रहात आहे. दिगूला रात्री उशिरा झोपण्याची व सकाळी उशिरा उठण्याची सवय आहे. रोज पेपर वाचनाची सवय आहे. त्याचे वय जवळ जवळ पन्नास वर्ष आहे. दिगू हा दरवर्षी पंधरा ऑगस्टला क्रांती मैदानावर ध्वजवंदनाला जात असतो. दिगूच्या घरकामासाठी ईला वेकंप्पा खुरमांडे ही मुलगी आहे. ती दिगूची भांडी घासणे, कपडे धुणे, लादी पुसणे व इतर कामे करते. दिगूची दत्तावर आणि साईबाबांवर श्रध्दा आहे, तो नेहमी स्नान झाल्यानंतर दत्ताला हार घालून दत्ताच्या नावाचा जयघोष करतो.साईबाबांपुढे उदबत्या लावून पाच मिनिटे नामस्मरण करीत असतो. दिगूला त्याच्या शेजारच्या कावळे वहिनी

रोज सकाळी चहा देतात. दिगूला सिगारेट ओढण्याचे व्यसन आहे. दिगू रोज कोळीवाडयाच्या ठरलेल्या हॉटेल मधील जेवण उरकून तो आपल्या कामाला सुरूवात करीत असे.

'दै. उषावार्ता' या वृत्तपत्रासाठी राजकीय व मंत्रीमंडळातील बातम्यांची जबाबदारी दिगू वर असते. दिगू हा रोज दुपारी 'दै. उषावार्ता' च्या कार्यालयात फोन करून वृत्तपत्रीय बातम्याचा खुलासा करीत असतो. 'दै. उषावार्ता' च्या संपादकांचा दिगूवर विश्वास आहे, ते दिगूचे लग्न जमविण्याचा प्रयत्न करीत असतात. दिगू टिपणीस हा सर्व राजकीय वर्तुळातील लोकांच्या ओळखीचा आहे. ते सर्व लोक त्याला 'दिग्या' असे म्हणतात. दिगूला अर्थमंत्री दाभाडे आपल्या पदाचा राजीनामा देणार असल्याचे आमदार अर्जून मोरे सांगतात. दिगूचा राजकारण हा आवडीचा विषय आहे. दिगूचे मुख्यमंत्री अर्थमंत्री दाभाडे, इतर आमदार, कृषीमंत्री, व मंत्रीमंडळातील मंत्री यांच्याशी स्नेहाचे संबंध आहेत. दिगू या सर्वांना विश्वासात घेऊन आपली पत्रकारिता प्रामाणिकपणे पार पाडत असतो. दिगू हा अनुभवी राजकीय वार्ताहर म्हणून ओळखला जातो. मुंबईतल्या राजकीय वार्ताहरामध्ये त्याचा शब्द महत्वाचा मानला जातो. इतर पेपरचे प्रतिनिधी त्याच्या सल्ल्यानुसार आपली वार्तापत्रे लिहित असत. दिगू हा कोणत्याही गोष्टीची काळजी करत नाही. दिगू सर्व कामे स्वत:च्याच सवडीने करणारा आहे. दिगूच्या आईने व बहिणीने दिगूने लग्न करावे यासाठी प्रयत्न केले परंतु दिगूने त्या विषयावर मौन पाळले आहे. त्याच्या पन्नास वर्षाच्या आयुष्यात अनेकदा मोहाचे प्रंसग आले होते परंतू ते त्याने टाळले होते. त्याने एका मुलीवर प्रेम केल आहे. परंतु ते अयशस्वी झाले होते. दिगूने ब्रम्हचर्य पाळले होते याचा मुंबई वार्ता विश्वात विनोदाचा आणि टिंगलीचा विषर झालेला आहे. त्याचे मित्र या विषयावर टिंगल करतात पण दिगू ते हसण्यावारी नेतो. दिगूच्या लैगिंक कामभावना ईला खुरमांडे या घरकामासाठी येणाऱ्या

मुलींमुळे उफाळत असतात. परंतू दिगू यावर नियंत्रण ठेवतो. दिगूला राजकारणातील लोकांचा आदर वाटतो. कारण ते सर्व लोक महाबिलंदर व इरसाल डोक्याचे असतात.दिगूला राजकीय लोकांना राजकारणाचे सल्ले देण्याचे आवडते. दिगू हा असे सल्ले देत असतो. दिगूला कधी कधी आपण हे सर्व कशासाठी करतो आहोत असा प्रश्न पडतो. परंतु दिगू हा गंभीर विचार करणारा माणूस नाही. दिगू हा झटपट निर्णय घेऊन त्यावर कृती करणारा पत्रकार आहे. त्याने स्वातंत्र्य चळवळ संपल्यावर व स्वातंत्र्य मिळाल्यावर आपला नव्या राजकारणात काही उपयोग नाही आणि राजकारणाचा आपल्याला आयुष्यात फारसा उपयोग होणार नाही हे ओळखून उदरनिर्वाहासाठी पत्रकारिता स्वीकारली होती. त्याला पत्रकारिता मानवली होती तो पत्रकारितेत पूर्ण रस घेऊन प्रामाणिकपणे करीत होता. दिगू सहसा कुणावर अन्याय करत नाही. प्रत्येकाच्या चांगल्या गुणाकडे पाहण्याची त्याची वृत्ती होती.दिगूला राजकारणाविषयी, राजकारणी व्यक्तीविषयी, त्याला प्रामाणिकपणे वाटते की, ‘‘या सर्व वर्तुळामधे निर्भेळ समाज सेवेच्या प्रेरणेनं आणि तळमळीनं सत्तेच्या मागे लागलेला एकही राजकारणी नाही आताच्या राजकारणाच्या प्रेरणा काय होत्या? सत्ता फक्त सत्ता सत्तेचा कैफ. सगळे तसे म्हणतात खरे, पण यांच्या खऱ्या प्रेरणा वेगळयाच आहेत स्वयंकेंद्रीत आहेत. खरोखर मला समाजासाठी अमुक एक करून दाखवायचं आहे, म्हणून मला मंत्रिपद मिळवायचं आहे. किंवा टिकवायचं आहे. असा विचार करणारा कोणीच असू नये? माझ्यामागे इतके लोक आहेत, म्हणून मला खुर्ची हवी. अमक्यापेक्षा मी मोठा म्हणून मला मंत्रीपद हव; आमक्या खात्यात पैसा जास्त, म्हणून ते खातं हवं, मलाच हवं... हे काय! या आपल्या सत्तेच्या राजकारणाच्या प्रेरणा (१९) हे दिगू चे मत योग्य आहे असे मला वाटते. दिगू आपल्या पत्रकारितेबद्दल मत व्यक्त करतो की, आपली बातमीदारी... भडवेगिरीसारखी. आणि आपल्या प्रेरणा तरी कोणत्या? काहीच नाही. केवळ पोट भरणे

या लोकांना दोष देण्यात तरी काय अर्थ?[२०] अशा वेळी दिगूला आपले आयुष्य, आपली बातमीदारी विफल आहे असे वाटते.

दिगूकडे कोणत्याही लहान मोठया माणसाला वश करण्याची विलक्षण खुबी आहे. तो योग्य वेळ येताच आपली बुध्दी वापरत असे. आपल्या मागून वृत्तपत्र व्यवसायात आलेल्या पत्रकारांनी मोठया पेपर्समध्ये यश, नाव कमाविले परंतु आपण अजूनही मंत्रिमंडळाच्याच बातम्या देत आहोत यामुळे तो अस्वस्थ होतो. दिगूला त्याचे मित्र लग्न करण्याचा सल्ला देतात. दिगू शेवटी संपादकाच्या म्हणण्यानुसार लिला मर्कळे या प्राध्यापिकेशी लग्न करण्यास तयार होतो. दिगू लिला मर्कळेशी लग्न झाल्यानंतर बातमीदारी सोडून उपसंपादकाची नोकरी करण्याचे बेत आखतो. परंतु आपण पत्रकारिते शिवाय जगूच शकणार नाही असे त्याला वाटते.

दिगू टिपणीस याने आपली पत्रकारिता पार पाडताना जे जे दिसले, जे सत्य वाटले जे पटले ते सर्व लिहिले तो कोणत्याही राजकीय नेत्याचा मिंधा झाला नाही. सत्तारूढ अथवा विरोधी पक्षाचे आमदार तसेच मंत्रीगण हे भ्रष्टाचाराचे व अन्यायाचे प्रमुख स्त्रोत असतात. या राजकारणी मंडळीवर फक्त पत्रकारांचाच अंकुश चालू शकतो. कारण पत्रकाराची लेखनी एका दिवसात शेकडो हजारो नव्हे तर लाखो लोकापर्यंत पोहचत असते याच पध्दतीने दिगूने राजकारणी लोकांवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

### ३.१ 'सिंहासन' मधील पत्रकार दिगूचे विशेष

सिंहासन या कादंबरीमध्ये दिगू टिपणीस ही एकमेव पत्रकार व्यक्तिरेखा आहे. या एकमेव पत्रकार व्यक्तिरेखेचा विचार केल्यानंतर त्या व्यक्तिरेखेतील काही वैशिष्टये दिसून येतात ती पुढीलप्रमाणे आहेत.

१. दिगू टिपणीस हा 'दै. उषावार्ता' या मराठी दैनिकाचा मुख्य राजकीय वार्ताहर आहे.

२. दिगू आपली पत्रकारिता मनापासून करीत असतो. केवळ बातम्या मिळवून त्या छापणे असा हमाली उदयोग नव्हता. राजकारण हा आवडीचा विषय असून कुठे काय चालू आहे, याची माहिती आपल्याला सर्वात अगोदर कळावी अशी पत्रकारी जिद्द त्याच्यामध्ये होती.

३. दिगू टिपणीस सर्व समाजात, राजकीय वर्तुळात सगळीकडे जाणीवपूर्वक वावरून माहिती काढणारा सर्वज्ञ वार्ताहर आहे. त्यामुळे तो सर्व राजकारणामध्ये प्रिय आहे. राजकीय लोकांशी त्याचे सलोख्याचे स्नेहाचे संबंध आहेत.

४. दिगू टिपणीस हा निर्भिड, जाणकार, चौकस बुध्दीचा वार्ताहर आहे. तो कुणाचाही मिंधा नाही, लाचार नाही.

५. दिगू टिपणीस हा ताठ मानेने राहणारा पत्रकार असून त्याला राजकीय घटनांची उलाढालींची, अनेकांच्या गुंतागुंतीच्या परस्पर राजकीय संबंधांची जवळून माहिती होती. राजकीय वार्ताहरामध्ये त्याच्या शब्दाला किमंत होती.

६. दिगूचा देवावर विश्वास आहे. तो नेहमी दत्ताची व साईबाबांची पूजा करीत असतो. तो अविवाहित आहे. दिगूचे ब्रम्हचर्य हे मुंबईच्या वार्ताविश्वात मोठया विनोदाचा व टिंगलीचा विषय आहे.

७. दिगू हा अनुभवी पत्रकार असून झटपट निर्णय आणि कृती हे त्याचे सूत्र आहे. आपली पत्रकरिता प्रामाणिकपणे पार पाडणारा आहे. दिगूकडे दूरदृष्टी आहे.

८. दिगू टिपणीस हा बुद्धिमान पत्रकार असून कोणत्याही लहान मोठया माणसाला वश करण्याची कला त्याच्या अंगी आहे. त्याच्याकडे स्पर्धेत टिकून राहण्याचे कौशल्य आहे.

९. दिगूकडे जिद्द, चिकाटी, तत्परता, कष्ट करण्याची तयारी, कामावरील निष्ठा इ. गुण असून त्याचे व्यक्तिमत्व अष्टपैलू आहे.

१०. दिगूची पत्रकारीता ही शोधक आहे त्याची बातमी इतरापेक्षा वेगळी असते. तो इतर पेपर्सच्या वार्ताहरांवर मात करून आपल्या कल्पकतेने बातमी देत असतो.

## ४. 'सिंहासन' मधील इतर प्रातिनिधिक व्यक्तिरेखा

सिंहासन मध्ये राजकीय व सामाजिक जीवनातील मुख्यमंत्री विश्वासराव दाभाडे, माणिकराव पाटील, आनंदराव टोपले, बुधाजीराव गोडघाटे, जीवनराव वाघमारे, उस्मान दळवी, दत्ताजीराव जाधव, श्रीपतराव शिंदे व ईला खुरमांडे या प्रातिनिधिक व्यक्तिरेखा येतात त्यांचा आता थोडक्यात विचार करू.

### मुख्यमंत्री

राज्याचे मुख्यमंत्री-त्यांचा उल्लेख कादंबरीत सी. एम्. असाच येतो. ते पुणे जिल्ह्यातील आहेत. ते बुद्धिमान असून, शेतीशी फारशी बांधिलकी नसलेले, इतरांशी अंतर ठेवून वागणारे पण अत्यंत चाणाक्ष असे गृहस्थ आहेत. ते राज्याच्या नेतृत्वाची धुरा व्यवस्थितपणे पार पाडत आहेत. राज्याचा विकास होण्यासाठी ते जास्त उदयोगधंद्यावर लक्ष देतात. मुख्यमंत्री पदाच्या महत्वाकांक्षेने झपाटून विद्यमान हे अर्थमंत्री विश्वासराव दाभाडे यांनी आपल्या अर्थमंत्री पदाचा राजीनामा जाहीर करून मुख्यमंत्र्यासमोर आव्हान उभे केलेले असते. परंतु त्या आव्हानाला न डगमगता मुख्यमंत्री सामोरे जातात. मुख्यमंत्री हे माणसाचे कच्चे दूवे हेरून त्यांना आपल्याकडे वळवितात. मुख्यमंत्री हे सध्याच्या कामाची व्याप्ती पाहता मंत्रिमंडळाचा विस्तार करणे आवश्यक आहे असे जाहीर करतात. याचाच आधार घेऊन मुख्यमंत्री आपली ताकद वाढविण्यासाठी प्रयत्न करतात. मुख्यमंत्री यांना दिल्ली येथे ॲटॅक येतो. परंतु ते त्यातून बचावले जातात. मुख्यमंत्री

आपल्या ताकदी द्वारे इतरांना प्रलोभने दाखवितात. मुख्यमंत्र्यांच्या ताकदीपुढे अर्थमंत्री विश्वासराव दाभाडे यांची ताकद कमी पडते. शेवटी मुख्यमंत्री त्यांचा राजीनामा स्वीकारतात.

**अर्थमंत्री विश्वासराव दाभाडे**

श्री. विश्वासराव दाभाडे हे राज्याचे विद्यमान अर्थमंत्री आहेत. ते विदर्भातील आहेत. विश्वासराव दाभाडे हे ओबड धोबड असले तरी खानदानी करारीपणा त्यांच्यात आहे. त्यांच्या नजरेत जरब व गुर्मी होती. ग्रामपंचायतीच्या अध्यक्षापासून ते मंत्रिमंडळ पर्यंतचा प्रवास त्यांनी आपल्या ताकदीने केला. मंत्रिमंडळात आल्यावर त्यांनी राज्याच्या सर्वोच्च पदाची ईर्षा धरली. त्यानुसार अर्थमंत्री दाभाडे आपल्या राजीनाम्याचे नाटक पुढे करून विद्यमान मुख्यमंत्री यांच्या समोर आव्हान उभे करतात. त्यांना वसंतराव नावाचा उच्चशिक्षित मुलगा आहे. कमला ही त्याची पत्नी असून तिच्याकडे राजकीय समज व आकांक्षा आहेत. ती विश्वासरावाच्या राजकारणात पुढाकार घेते. अर्थमंत्री विश्वासराव दाभाडे यांनी माजी सेक्रेटरीच्या लतिका नावाच्या मुलीबरोबर लग्न केलेले असते. अर्थमंत्री दाभाडे यांचे कर्तृत्व डॅशिंग आहे. बरेच लोक दाभाडयांच्या मालकासारखी सत्ता गाजवण्याच्या स्वभावामुळे टरकून असतात. दाभाडे हे सरळमार्गी आहेत. शेतीचे आधुनिकीकरण करणे, पदवीपर्यंत शिक्षण मोफत करणे, शेतमजुरांचे सरंक्षण करणे, सहकारी कारखानदारी वाढविणे यावर ते भर देतात. अर्थमंत्री दाभाडे हे बेरजेचे राजकारण करणारे मुरब्बी नेते आहेत. मराठवाडयातील माणिकराव पाटील यांचा गट, कोकणातले लक्ष्मणराव लांजेकर यांचा गट, रावसाहेब टोपले यांची ताकद, नगरचे शुगरकिंग गणपतराव भोसले यांची ताकद अशी सगळीकडे बेरीज करण्याची त्यांची धडपड चालू असते. त्यानुसार आपली ताकद वाढविण्यासाठी प्रयत्न करतात. परंतु या सत्तेच्या संघर्षात अर्थमंत्री दाभाडे यांची ताकद कमी पडते. मुख्यमंत्री त्यांचा राजीनामा स्वीकारतात.

## माणिकराव पाटील

श्री. माणिकराव पाटील हे राज्याचे विद्यमान कृषिमंत्री आहेत. ते मराठवाडयातील असून जिल्हा मधवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष ते कृषिमंत्री असा त्यांचा प्रवास आहे. त्यांनाही मुख्यमंत्री होण्याची आस लागली आहे. ते मराठवाडयातीलच असणारे उद्योगमंत्री मारोतराव पवार व आरोग्यमंत्री भगवानराव कुणगेकरांचा पाठींबा मिळविण्याचा प्रयत्न करतात. ते या दोघांपेक्षाही राजकारणात वरिष्ठ आहेत. माणिकराव हे मुख्यमंत्री व अर्थमंत्री या दोघापासून सारखे अंतर ठेवून आहेत. मुख्यमंत्र्यांना पाठींबा देऊन पुढच्या निवडणुकी नंतरचे आश्वासन मिळवायचे, किंवा अर्थमंत्री दाभाडे यांच्या बाजूनी वजन टाकायचे असे दोन पर्याय माणिकरावाकडे आहेत. शेवटी माणिकराव पाटील हे मुख्यमंत्री यांना आपला पाठींबा जाहीर करतात. राज्याचे मुख्यमंत्री ही त्यांची दखल घेतात. त्यांना मंत्रिमंडळातील व्दितीय क्रमांकाचे असणारे अर्थमंत्री पद देऊन त्यांचा गौरव करतात.

## आनंदराव टोपले

श्री. आनंदराव टोपले हे राज्याचे राज्यमंत्री असून सध्या त्यांच्याकडे अर्थ खाते आहे. ते पुणे जिल्ह्यातील चिरगुंटे गावचे आहेत. आनंदराव टोपले हे पूर्वीचे कुस्तीगीर होते. आनंदराव टोपले यांच्याकडे खानदानी रूबाब असून ते तरूण, हुशार आहेत. ते मुख्यमंत्र्यांच्या जवळच्या नात्यातील आहेत. त्यांचे चुलते रावसाहेब टोपले हे मोठे शेतकरी आहेत. अनेक साखर कारखाने, जिल्हा परिषदा व तत्सम संस्था यांच्यावर ताबा असलेला वजनदार गृहस्थ आहेत. आनंदराव टोपले यांनी मंत्रिमंडळात समाजकल्याण, क्रिडा व युवककल्याण खातीही सांभाळलेली आहेत. त्यांना रावसाहेबांचा पाठींबा आहे. आनंदराव टोपले यांचे मित्र आमदार जीवनराव वाघमारे आहेत. अर्थमंत्री व मुख्यमंत्री यांच्या संघर्षात मुख्यमंत्री यांना पाठींबा देण्यासाठी ते जीवनराव वाघमारे

यांना सांगतात. त्याप्रमाणे सी.एम्. यांना आनंदराव टोपले, जीवनराव वाघमारे यांचा पाठींबा मिळतो. त्यांना अर्थखात्याचे मंत्री म्हणून नियुक्त करतात.

**दत्ताजीराव जाधव**

सिंहासनमधील आणखी एक महत्त्वाची व्यक्तिरेखा म्हणजे श्री. दत्ताजीराव जाधव हे महसूलमंत्री आहेत. त्यांच्याकडे कुशाग्र असे वकृत्व आहे. त्यांची पत्नी डोरोथी आहे. ती अमेरिकन आहे. ती सामाजिक कार्यात अग्रेसर आहे. दत्ताजीराव जाधव हे तिच्यामुळेच राजकारणात आले असून ते व्यवस्थितपणे राजकारणाची धुरा सांभाळतात. दत्ताजीराव जाधव हे बुध्दिमान, रसिक व काहीसे आरामात राहण्याच्या वृत्तीचे मंत्री असून त्यांना ही मुख्यमंत्री होण्याची इच्छा आहे. आपल्याला पाठिंबा किती मिळतो यासाठी ते सर्व मंत्र्याची व आमदारांची बैठक आपल्या घरी आयोजित करतात. बैठकीला हजर असणारे यांच्यामध्ये अर्थमंत्री दाभाडे, कृषिमंत्री माणिकराव पाटील हे असतात. परंतु बैठकीच्या दरम्यान दिगूने मुख्यमंत्री यांना दिल्लीत ॲटॅक आला असल्याचे दत्ताजीराव जाधवांना फोनवरून सांगितले. त्यामुळे त्यांच्या राजकीय बैठकीचा संदर्भच बदलून जातो. ही बैठक कोणताही निर्णय न होता विस्कटते.

**बुधाजीराव गोडघोटे**

श्री. बुधाजी सखाराम गोडघाटे हे राज्याचे समाजकल्याण विभागाचे विद्यमान उपमंत्री आहेत. त्यांनी हलाखीतच लॉ कॉलेजचे शिक्षण पूर्ण केलेले असते.त्यांना शिक्षणासाठी नानासाहेब गुप्ते यांनी मदत केलेली असते. कायद्याची परीक्षा पास झाल्यानंतर नानासाहेबांच्या सांगण्यावरून त्यांनी दर्यापूर येथे वकिली सुरू केली. तेव्हा पासून ते स्थानिक राजकारणात लक्ष देऊ लागले. पुढे ते पक्षात येतात याचदरम्यान त्याच्या पासून मथुरा नावाच्या मुलीला दिवस जातात हे जेव्हा त्यांना कळते त्यावेळी ते तिला औषध देतात. त्या औषधाने तिचा मुत्यू होतो. तिचे वडील व्यंकप्पा बुधाजी

विरूध्द खुनाची फिर्याद नोंद करतात. परंतु बुधाजीला नानासाहेब गुप्ते या प्रकरणातून वाचवितात. पुढे नानासाहेबाच्या माध्यमातून मुख्यमंत्र्याशी ओळख होते. परंतु प्रादेशिक राजकारणात विश्वासराव दाभाडे बुधाजीराव यांना जवळ करतात. पुढे आपण अर्थमंत्र्याच्या जवळ जाण्याने मुख्यमंत्री यांना दुखावत असल्याच बुधाजीच्या लक्षात येत. अर्थमंत्री व मुख्यमंत्री यांच्यात संघर्ष सुरू असतो. अर्थमंत्री आपली ताकद आजमावत असताना बुधाजीराव गोडघोटे हे त्यांना पाठींबा न देता ते मुख्यमंत्री यांना पाठींबा देतात. पुढे मुख्यमंत्री आपल्या मंत्रिमंडळाच्या पुनर्रचनेत बुधाजीराव गोडघोटे यांना बढती देऊन गृहखाते देतात.

**जीवनराव वाघमारे**

श्री.जीवनराव वाघमारे हे आमदार आहेत. ते राज्यमंत्री आनंदराव टोपले यांचे मित्र आहेत. अर्थमंत्री व मुख्यमंत्री यांच्या राजकीय सत्ता संघर्षात ते मुख्यमंत्री यांना पाठींबा देतात. ते विदर्भातील अमरावतीचे आहेत. जीवनराव वाघमारे हे आपल्या वक्तृत्वाच्या बळावर जिल्हा परिषद ते विधान सभेचा प्रवास केला आहे. त्यांची लोकप्रिय आमदार म्हणून ख्याती आहे. पूढे मुख्यमंत्री हे आपल्या मंत्रिमंडळाच्या वाढीत जीवनराव वाघमारे यांचे नाव निश्चित करतात.

**श्रीपतराव शिंदे**

श्री. श्रीपतराव शिंदे हे आमदार आहेत त्यांनी स्वातंत्र्य लढयात महत्वाची कामगिरी केली आहे. मंत्रिमंडळातील तरूण आमदार 'काय स्वातंत्र्यवीर' म्हणून टिंगलटवाळी करतात. त्यांना आताच्या राजकारणाचा वीट आला आहे. ते या राजकारणाला कंटाळलेले आहेत. त्यांना आनंदराव टोपले हे मुख्यमंत्री यांच्या वतीने एक संधी देतात. परंतु ते ती संधी नाकारतात. अर्थमंत्र्याच्या कडून ही त्याना फोन येतो ते या राजकीय सत्तास्पर्धेच्या घडामोडीमुळे अस्वस्थ होतात. शेवटी श्रीपतराव शिंदे हे विफल अवस्थेत रेल्वेच्या रूळाखाली सापडतात आणि त्यातच त्यांचा मृत्यू होतो.

**उस्मान दळवी**

श्री. उस्मान मोहमंद दळवी हे आमदार असून गर्भश्रीमंत आहेत. त्यामुळे त्यांना मंत्रीपदाची वा इतर प्रलोभनांची आशा नाही. परंतु आपल्याला हवी तशी माणसे मंत्री झाली पाहिजेत असे त्यांना वाटत होते. आमदार लक्ष्मणराव लांजेकर हे मंत्री व्हावेत असे त्यांना प्रामाणिकपणे वाटते. त्यांना एखादे महत्त्वाचे खाते मिळाले तर ते मंत्रीपद घेण्यास तयार आहेत. पक्षाचा दिल्लीच्या वर्तुळात त्यांची ओळख आहे. ते फार शिकलेले नसून व्यवहारी व तडफदार आमदार म्हणून त्यांचा नावलौकिक आहे. ते मुख्यमंत्री यांना आपला पाठींबा देतात. मुख्यमंत्री हे आपल्या मंत्रीमंडळाच्या वाढीत त्यांचे नांव घेतात व ते राज्यमंत्री होतात.

**ईला खुरमांडे**

ईला वेकंप्पा खुरमांडे ही चौदा वर्षाची मुलगी दिगू टिपणीस यांच्या घरी घरकाम करणारी आहे. ईला लादी पुसणे, कपडे धुणे, भांडी घासणे, झाडलोट करणे इ. कामे करत असे. ईला हे काम तीन ते साडेतीन वर्षापासून करीत आहे. ती प्रामाणिकपणे काम करीत असते. ईलाला पाहून दिगूच्या कामवासना जाग्या होत असतात. ईला ही झोपडपट्टीत राहणारी महार समाजातील आहे. ईला ही चंदा रेलवानी कडे ही धुण्या-भांडयाचे काम करीत असे. चंदा रेलवानीच्या फ्लॅट सारखा प्रशस्त, सुंदर, वैभवशाली, सहा खोल्यांचा फ्लॅट तिने पाहिलेला नाही. ईलाला चंदा रेलवानी आवडत असते. समाजकल्याणचा उपमंत्री बुधाजीराव गोडघोटे हा तिचा काका आहे. पूढे ईलाचे आई-वडील हे ईलाला घेऊन मुंबई सोडून दर्यापूर येथे येतात. ईलाला मुंबई सोडताना हुरहूर वाटते. मुंबईला जे मिळाले नाही ते दर्यापूरला मिळेल ही असे न अनुभवलेल्या गोष्टी विषयीचे तिला आकर्षण वाटतं होते.

'सिंहासन' या कादंबरीतील व्यक्तिरेखांचा विचार केल्यानंतर आता सिंहासन कादंबरीचे विशेष थोडक्यात पाहू.

## ५. **'सिंहासन'कादंबरीचे विशेष**

१. 'सिंहासन' मधून राजकीय सत्तास्पर्धेचे समकालीन वास्तवतेच्या पातळीवरुन चित्रण केलेले आहे.

२. 'सिंहासन' या कादंबरीने स्वातंत्र्योत्तर काळातील इतर राजकीय कादंबऱ्यांना चालना, प्रेरणा दिली आहे असे वाटते.

३. 'सिंहासन' मधील राजकीय सत्तास्पर्धेचे नाटय हे वीस ते तीस दिवसातील आहे.

४. 'सिंहासन' मधून चित्रित झालेले राजकीय जीवन हे स्वातंत्र्योत्तर काळातील आहे.

५. 'सिंहासन' मध्ये सिनेमॅटिक निवेदन पध्दतीचा वापर केलेला आहे.

६. 'सिंहासन' या कादंबरीचा विषय राजकारण आहे. या कादंबरीचा आशय, लेखनशैली, विविध राजकीय व्यक्तिरेखा या बाबी इतर कादंबऱ्यांपेक्षा वेगळया आहेत.

७. 'सिंहासन' कादंबरी मध्ये कोणतेही विशिष्ट पात्र केंद्रस्थानी नाही.

८. 'सिंहासन' या कादंबरीला वृत्तपत्रीय शैलीचे व भाषेचे अंग आहे.

९. 'सिंहासन' या कादंबरी मध्ये अरूण साधूंनी वैशिष्टयपूर्ण अशी मराठी, इंग्रजी, हिंदी, वऱ्हाडी संमिश्र भाषा शैली वापरली आहे.

१०. अरूण साधूंनी ठराविक कालावधीत घडणाऱ्या राजकीय नाटयाची थरारकता हा कादंबरीचा विषय होऊ शकतो. हे त्यांनी प्रथम 'सिंहासन' या कादंबरीतून दाखवून दिले.

११. 'सिंहासन' कादंबरीमध्ये राजसत्तेसाठी चालणाऱ्या डावपेचाचे वर्णन आहे. सिंहासनाला पक्के चिकटून राहणारे मुख्यमंत्री व त्यांना खाली खेचण्यासाठी पेचप्रसंग निर्माण करणारे अर्थमंत्री यांच्यातील ही स्पर्धा आहे .

१२. 'सिंहासन' या कादंबरीवरून 'सिंहासन' नावाचा एक वेधक मराठी चित्रपट ही तयार करण्यात आला. याला वेगवेगळे पुरस्कार मिळून तो चित्रपट गाजला आहे.

## ▪ समारोप

अरूण साधू यांची 'सिंहासन' ही राजकीय क्षेत्राचे चित्रण करणारी वैशिष्टयपूर्ण कादंबरी आहे. पत्रकारितेच्या माध्यामातून अरुण साधू यांनी या कादंबरीत सर्व पात्रे, घटना यांची मांडणी केली आहे. राजकीय सत्तास्पर्धा किती खालच्या पातळीवर जाऊ शकते याचे प्रत्ययकारी चित्रण अरुण साधू करतात. या कादंबरीत कोणतीही एखादी व्यक्ती नायक नसून राजकारणातील सत्तास्पर्धा हीच मध्यवर्ती आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून कादंबरी लिहीली असल्यामुळे क्वचित ठिकाणी वार्तांकनाचे स्वरूपही कादंबरीला लाभलेले दिसते. राजकीय जीवनातील राजकारण याविषयाचे तपशीलवार चित्रण करण्याच्या पद्धतीमुळे राजकीय परिस्थितीच्या चित्रणाची एक नवी पद्धत मराठी कादंबरीच्या क्षेत्रात 'सिंहासन' या कादंबरीद्वारे आली आहे, असे म्हणता येईल.

- **संदर्भग्रंथ सूची**


| | | | |
|---|---|---|---|
| १. | साधू, अरुण | : | 'सिंहासन' ग्रंथाली प्रकाशन, मुंबई,आठवी आवृत्ती, नोंव्हेबर-२००६, पृ. ११,१२. |
| २. | तत्रैव | : | पृ. १६. |
| ३. | तत्रैव | : | पृ. ७६. |
| ४. | तत्रैव | : | पृ. ७७. |
| ५. | तत्रैव | : | पृ. २३१. |
| ६. | तत्रैव | : | पृ. २८९. |
| ७. | तत्रैव | : | पृ. ३४६. |
| ८. | शोभणे, रवींद्र | : | अरुण साधू यांच्या राजकीय कादंबऱ्या, 'ललित' फेब्रु.-२००७, पृ. ४९. |
| ९. | संपा. सारडा, शंकर वालावलकर, कमलेश | : | 'कालदर्शी', कुमार केतकर- सिंहासन : भविष्यातील घटितांचा वेध, आशय पब्लिकेशन्स्, सांगली प. आ., जाने-२००७, पृ. २९. |
| १०. | साधू, अरुण | : | 'सिंहासन' ग्रंथाली प्रकाशन, मुंबई,आठवी आवृत्ती, नोंव्हेबर-२००६, पृ. १०. |
| ११. | तत्रैव | : | पृ. १२२. |
| १२. | तत्रैव | : | पृ. १२३. |
| १३. | तत्रैव | : | पृ. १८४, १८५. |
| १४. | तत्रैव | : | पृ. २७०, २७१. |

१५. तत्रैव : पृ. ३१८.

१६. तत्रैव : पृ. ३३५.

१७. तत्रैव : पृ. १३७.

१८. तत्रैव : पृ. १३७.